क्र.१७६/आस्था-१/अ.प्र./अर्जित प्रत्यार्प्रित/२०१७.
पोलीस अधीक्षक रायगड यांचे कार्यालय,
अलिबाग, दिनांक :- ०१/०४/२०१७

विषय :- अर्जित प्रत्यार्पित रजा मंजुरी बाबत..........

आदेश :-

रायगड जिल्हयामध्ये कार्यतर असलेले सर्व पोलीस कर्मचारी/बिनतारी संदेश विभाग /मोटार परिवहन विभाग यांची सन २०१७-२०१८ या वित्त वर्षातील १५x१५ अर्जित/प्रत्यार्पित रजा मंजुर करणेत येत आहे.

१) सर्व प्रभारी अधिकारी कर्मचा-यांना रजेवर सोडण्याचे पत्रक तयार करुन नोटीस बोर्डवर लावतील.

२) दर महिन्यात १०% ०कर्मचारी सोडावे.

३) गणेशउत्सव, नवरात्र तसेच महत्वाचे बंदोबस्ताचा काळ वगळण्याची मुभा आहे.

४) पत्रकावर कर्मचारी यास रजेची आवश्यकता इतर वेळी असल्यास त्यांचे कारणासह फेरबदल करुन तसे पत्रक लावावे.

५) ज्या कर्मचा-यास रजेवर जायचे नसेल असे कर्मचा-यांचा अर्ज घेऊन तो आस्थापना शाखेत पाठवावा.

६) आस्थापना शाखा त्या प्रमाणे त्यांची नोंद सेवापटात घेऊन पोलीस उप अधिक्षक मुख्यालय यांची स्वाक्षरी घेतील.

७) दर महिन्याच्या गुन्हे परिषदेचे वेळी सदर बाबतची माहीती प्रभारी अधिकारी मा.पोलीस अधीक्षक यांना स्वत: देतील.

८) उप विभागीय अधिकारी या बाबत पर्यवेक्षीय काम पाहतील.

सर्व पोलीस कर्मचा-यांनी सदरची रजा दिनांक ३१/०३/२०१८ पर्यत भोगावयाची आहे. जे पोलीस कर्मचारी रजा मुदतीत भोगतील त्या कार्मचा-यांची देयके विना विलंब या कार्यालयांत मंजुरीकरीता सादर करावी व सदर देयकात प्रत्येक पोलीस कर्मचा-याला कोणत्या तारखेला रजेवर सोडलेले आहे. हे नमुद करणे आवश्यक आहे. यापुढे अर्जित रजा मंजुरीकरीता कोणही स्वतंत्र अर्ज करु नये. १५ दिवसापेक्षा जास्त कालावधीची अर्जित रजा पाहिजे असल्यास तसा स्वतंत्र अर्ज करावा.

तसेच दर महिन्याला आपण किती कर्मचा-यांना अर्जित/प्रत्यार्पित तसेच फक्त अर्जित रजेवर सोडले असल्यास त्यांची खालील तक्त्यांत माहिती सादर करावी. जेणेकरुन त्यांचे रजेच्या खात्यातून उपभोगलेली रजा वजा करता येईल.

| अ.क्र. | कर्मचा-यांचा नांव व हुददा | रजा मागण्याचे कारण | पासुन | पर्यत | एकुण कालावधी | रजेचे प्रकार अर्जित/प्रत्यार्पित |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

(राजेंद्र दंडाळे)
पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय)
रायगड-अलिबाग.

प्रति,

सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी/स्थानिक, शाखा/ राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय अलिबाग.
सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी/प्रमुख लिपीक, लेखा शाखा.

C:\GA\Ganeshb Andhere\2016 Leave.docx